◆धामणगाव रेल्वे ◆ बुधवार 10 जुन , 2026 ◆वर्ष-12 वे ◆अंक-09 ◆पृष्ठ-४ ◆किंमत-४ RNI Regn no.- MAHBIL/2013/54875 Post Regd.No.-ATI/RNP/3337/2025-2027

साप्ताहिक
# नव प्रहार
भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

मुख्य संपादक:-संजय पांडे मो.८५५२९५८५५५ navprahar2013@rediffmail.com

# जिल्हा खणीकर्म अधिकारी यांच्या संपत्तीची चौकशी करा:डोंगरे

- तक्रारी नंतर आष्टी तालुक्यातील घाटात गेलेल्या शेळके यांनी 14 लक्ष रुपयात प्रकरण मॅनेज केल्याचा आरोप
- हिंगणघाट तालुक्यातील अनेक घाटात यांच्या आशीर्वादाने मोठ मोठ्ठे पडले खड्डे
- या खड्डुयात जीवात हानी झाल्याने त्याचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी



**आर्वी / विशेष प्रतिनिधी**

कारवाई साठी घाटावर गेलेल्या जिल्हा खणीकर्म अधिकाऱ्याने कारवाई करणे तर सोडा उलट अवैध उत्खनन करत असलेल्या घाट चालकाकडून प्रकरण रफदाफा करण्यासाठी 14 लाख रुपयांची लाच घेतल्याचा आरोप पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष मेघराज डोंगरे यांनीं शासन आणि प्रशासन दरबारी दिलेल्या तक्रारीत केला आहे. तसेच मागील अनेक वर्षात त्यांनी बेकायदेशीर रित्या मोठ्या प्रमाणात संपत्ती जमविली आहे. त्यांच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी अशी मागणी देखील या निवेदनाच्या माध्यमातून केली आहे .

आष्टी तालुक्यातील टेकोडा, गोदावरी, इस्माईलपुर, सिरसोली, दलपतपूर या घाटातून नियमबाह्य रित्या पोकलँड , फायबर बोट द्वारे रेतीचा अवैध उपसा होत असल्याची तक्रार मेघराज डोंगरे यांनी एडीएम आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. सोबतच अवैध उत्खनन करणाऱ्या घाट चालकांवर कारवाई करून त्यांच्या कडून शासकीय नियमांप्रमाणे दंड आकारण्यात यावा अशी मागणी देखील केली होती. या तक्रारी नंतर जिल्हा खाणीकर्म अधिकारी श्रीकांत शेळके हे ( पृष्ठ 2वर )

# तीव्र उष्णतेमुळे विदर्भातील शाळा 22 जूनपासून सुरू होणार

**पुणे** - राज्यात नवीन शैक्षणिक वर्षाची लगबग सुरू झाली असली, तरी विदर्भातील वाढत्या तापमानाचा पारा पाहता शिक्षण संचालनालयाने मोठा निर्णय घेतला आहे. विदर्भातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आता 15 जूनऐवजी 22 जून 2026 पासून सुरू होतील असे अधिकृत परिपत्रक शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर आणि शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांच्या स्वाक्षरीने 9 जून 2026 रोजी जारी करण्यात आले आहे. विदर्भात सध्या कमालीची उष्णतेची लाट सुरू असून नागपूर आणि आसपासच्या परिसरामध्ये कमाल तापमान 41एष्ट ते 42एष्ट च्या आसपास नोंदवले जात आहे. काही दिवसांपूर्वी ब्रह्मपुरी आणि इतर जिल्ह्यांमध्ये तर पारा 47एष्ट पर्यंत पोहोचला होता. जून महिना सुरू झाला तरी उष्णतेची ही तीव्र लाट कायम आहे. अशा अत्यंत प्रतिकूल हवामानात लहान मुलांच्या आरोग्याला उष्माघात आणि डिहाइड्रेशनचा त्रास होण्याची शक्यता आहे.

# लोकप्रतिनिधींना अंधारात ठेवून वाटली जात आहेत कामे !

## गव्हाणीपाणी च्या कामाबद्दल कोणालाच कल्पना नाही

## एका मजूर संस्थेच्या नावावर असलेल्या या कामातील हा खोटारडेपणा तक्रारी नंतर झाला उघड

**धामणगाव रेल्वे / विशेष प्रतिनिधी**

तालुक्यांत अनेक योजनेखाली वाटल्या जात असलेल्या कामांपैकी काही कामे लोकप्रतिनिधींना अंधारात ठेवून वाटली जात असल्याची खमंग चर्चा कार्यकर्ता वर्गात सुरू आहे. पण मांजरीच्या गळ्यात घंटा कोण बांधणार ? हा प्रश्न सगळ्यांना पडत आहे. त्यामुळे सध्यातरी हा विषय लोकप्रतिनिधींना माहीत आहे किंवा नाही याबद्दल संभ्रम असल्याचे समजत आहे.

लोकप्रतिनिधींच्या कथित रित्या जवळ असल्याचे किंबहुना त्यांचा खाजगी सचिव असल्याचे भासवत जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना जेरीस आणणाऱ्या व्यक्तीने



लोकप्रतिनिधींना अंधारात ठेवून गव्हाणीपाणी येथील स्मशानभूमी कडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे काम एका पूर्वीच्या वाळू माफियाला दिले होते. पण हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने गावकऱ्यांनी याबद्दल तक्रार केली होती.

एन पी नाईन चॅनलची चमू तक्रारी नंतर याठिकाणी गेली असता या सिमेंट रस्त्याला जागोजागी भेगा पडल्या होत्या.तर साइड पाट्या न भरल्या गेल्याने तो अनेक ठिकाणी बाजूने खचला होता. या कामात खरच भ्रष्टाचार झाल्याचे लक्षातं आल्यावर आम्ही ही बातमी प्रामुख्याने प्रकाशित केली होती.

**या कामाबद्दल लोकप्रतिनिधींना माहितीच नाही** - सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार सदर काम ज्या पूर्वीच्या वाळू माफियाला देण्यात आले होते त्याला काम देण्यास स्पष्ट मनाई होती. असे असताना सुद्धा केवळ स्वार्थी मित्रत्व निभवण्यासाठी एका मजूर संस्थेच्या नावावर या वाळू माफियाला हे काम देण्यात आले.

**जवळचे लोकं लोकप्रतिनिधींना ठेवत आहेत अंधारात** - या वाळू माफियाला लोकप्रतीधिनींच्या पश्चात हे काम देण्यात आल्याने जे ( पृष्ठ 2वर )

# थिलोरी ते गणेशपूर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

- ग्रामस्थांचे जिल्हा परिषद बांधकाम विभागाला निवेदन
- आठ दिवसांत काम न झाल्यास आंदोलनाचा इशारा





**दर्यापूर**- थिलोरी ते गणेशपूर या मुख्य मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने ग्रामस्थांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे तात्काळ दुरुस्तीची मागणी केली आहे. यासंदर्भात ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले असून पावसाळ्यापूर्वी रस्त्यावरील खड्डयांची डागडुजी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालक, शाळकरी विद्यार्थी, शेतकरी तसेच नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषत: शेतमालाची वाहतूक करताना शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.सदर रस्ता हा गावात जाणारा प्रमुख संपर्क मार्ग असून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा या मार्गावर सुरू असते.( पृष्ठ 2वर )

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियानांतर्गत दर्यापूरमध्ये दोन शेतकऱ्यांतील वाद मिटला

## तहसीलदारांच्या नेतृत्वात आपसी समजोता; शेत रस्त्याचा प्रश्न मार्गी

**दर्यापूर**- ग्रामीण भागातील शेत रस्त्यांबाबत उद्भवणारे वाद, तणाव आणि न्यायालयीन प्रकरणे कमी करण्यासाठी प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या %पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियान% अंतर्गत दर्यापूर तालुक्यातील दोन शेतकऱ्यांमधील शेत रस्त्याचा वाद सामंजस्याने मिटविण्यात आला. तहसीलदार रवींद्र कानडजे यांच्या नेतृत्वात दोन्ही शेतकऱ्यांमध्ये आपसी समजोता घडवून आणत हे प्रकरण मार्गी लावण्यात आले.



अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांमधील शेत रस्त्यांचे वाद परस्पर संवाद आणि सामंजस्याच्या माध्यमातून सोडविण्यावर विशेष भर दिला जात आहे.

दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील शेतकरी मयूर महेंद्रकुमार वांदे यांनी त्यांच्या शेतालगत असलेल्या शेतकरी दादाराव मधुकर माहोकार यांनी शेत रस्त्यावर नाली खोदून मार्ग अडविल्याची तक्रार तहसीलदार रवींद्र कानडजे यांच्याकडे दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत महसूल प्रशासनाने संबंधित ठिकाणाची पाहणी करून सखोल तपासणी केली.

त्यानंतर तहसीलदार रवींद्र कानडजे यांनी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियान' अंतर्गत दोन्ही पक्षांना समोरासमोर बसवून चर्चा केली. तलाठी व संबंधित महसूल कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत दोन्ही शेतकऱ्यांमध्ये आपसी समजोता घडवून आणत शेत रस्त्याच्या वादाचे प्रकरण निकाली काढण्यात आले.

वाद मिटल्याने दोन्ही शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यानंतर तहसीलदारांनी दोन्ही शेतकऱ्यांचे तहसील कार्यालयात पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि परस्पर सामंजस्याने प्रश्न सोडविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.प्रशासनाच्या या सकारात्मक पुढाकारामुळे ग्रामीण भागातील प्रलंबित शेत रस्त्यांचे प्रश्न न्यायालयात न जाता स्थानिक पातळीवर सोडविण्यास मदत होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण होत असून, या अभियानाचे शेतकरी वर्गातून स्वागत करण्यात येत आहे.

# त्या त्रिकुटाला एसडीएम ने दिला अधिकार की ते आपल्याच मनाने करताहेत कारभार ?

## सेटिंग साठी दिघी महल्ले येथे पाठविण्याचे प्रकरण

**चांदुर रेल्वे / विशेष प्रतिनिधी**

सध्या त्रिकुटा मुळे एसडीएम कार्यालय चांगलेच चर्चेत आहे. हे त्रिकुट एडीएम कार्यालयात रेती, मुरूम अथवा अन्य प्रकरणात आलेल्या लोकांशी कथित संपर्क साधून त्यांना ' सेटिंग 'करायचे असल्यास दिघी महल्ले येथील एका रेती चोराला भेटण्यासाठी सांगतात. वरून एसडीएम मॅडम त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणाचे ऐकत नाही असे देखील सांगतात. त्यामुळे या त्रिकुटाला एसडीएम ने दिला अधिकार की ते आपल्याच मनाने करताहेत कारभार ? असा प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात आहे.

मुरूम ,रेती चोरी प्रकरणात तहसीलदाराने कारवाई करून दंड केल्यास किंवा एखाद्या शेती अथवा तत्सम प्रकरणात तहसीलदाराने विरोधात निकाल दिल्यास नागरिक प्रकरण अपील मध्ये घेऊन एसडीएम कोर्टात येतात. या ठिकाणी कार्यरत तथाकथित सहाय्यक महसूल अधिकारी आणि तहसील कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी आणि महसूल सहाय्यक अपील मध्ये एडीएम कार्यालयात आलेल्या व्यक्तीची भेट घेऊन कथित रित्या



दिघी महल्ले येथील एका व्यक्तीचे साहेबा सोबत चांगले सबंध आहेत. त्याच्या एका कॉल वर किंवा ते प्रत्यक्ष संबंधित अधिकाऱ्याला भेटून बोलले तर तुमचे काम होऊन जाईल असे कथित रित्या सांगतात.

**कोणीही फायद्यासाठी यांच्या कचाट्यात सापडतो** - आपला दंड कमी व्हावा किंवा प्रकरणात आपल्या बाजूने निकाल लागावा यासाठी लोकं यांच्या ' बोल बच्चन ' मध्ये येतात. आणि यांनी सांगितलेल्या व्यक्तीशी संपर्क करून देण्यासाठी यांच्या मागे लागतात.

**खरंच एडीएम कार्यालयाचे इतके ' बुरे दीन ' आलेत काय ?** - हे त्रिकुट असं का ? वाटतेय याच्या तळात जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण हे त्रिकुट ज्या व्यक्तीचे नाव समोरच्या व्यक्ती जवळ घेतो तो रेती चोरटा आहे. आणि एसडीएम कार्यालयाचे इतके वाईट दिवस आले काय ? की ते अशा चोरट्याच्या माध्यमातून ' बोलणी ' करतील ?

**वरिष्ठांकडून या विषयाची गोपनीय चौकशी होणे आवश्यक** - बुद्धिजीवी वर्गाचे असे म्हणणे आहे की त्या त्रिकुटाकडून स्वत:च्या स्वार्थासाठी विनाकारण कार्यालयाची बदनामी होत आहे. त्यामुळें या प्रकरणाची गोपनीय चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी ( क्रमश: )

## संपादकीय

### ‘ग्रीन हायड्रोजन’

भारतात ऊर्जा, पर्यावरण आणि विकास या तिन्ही विषयांशी संबंधित प्रश्नांचा संगम ज्या एका विषयात दिसतो, तो म्हणजे ‘ग्रीन हायड्रोजन’. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा विषय केवळ वैज्ञानिक परिषदांपुरता मर्यादित होता; परंतु आज तो जागतिक राजकारण, अर्थकारण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. अशा वेळी ‘आयआयटी’ गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी विकसित केलेल्या नव्या तंत्रज्ञानाने संशोधन क्षेत्रातच नव्हे, तर भारताच्या ऊर्जा भविष्याबाबतही नव्या आशा निर्माण केल्या आहेत. पाण्यापासून स्वच्छ हायड्रोजन तयार करण्याची प्रक्रिया अधिक वेगवान, टिकाऊ आणि परिणामकारक बनवणे, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून संशोधन करण्यात आले. साध्या भाषेत सांगायचे, तर सूर्यप्रकाश आणि पाणी यांच्या साहाय्याने स्वच्छ इंधन तयार करण्याच्या दिशेने भारताने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हे केवळ तांत्रिक प्रगतीचे उदाहरण नाही, तर भविष्यातील ऊर्जा राजकारणात भारताला स्वतंत्र ओळख मिळवून देणारी शक्यता आहे.आज जग ऊर्जा संकटाच्या नव्या टप्प्यावर उभे आहे. गेल्या दोन शतकांपासून औद्योगिक विकासाचा पाया कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांवर उभा राहिला; परंतु या इंधनांनी जगाला विकास दिला, तितकाच पर्यावरणीय संकटाचाही वारसा दिला. हवामानबदल, वाढते तापमान, वितळणारे हिमनग, दुष्काळ, अतिवृष्टी आणि समुद्राची वाढती पातळी हे सारे परिणाम आता प्रत्यक्ष जाणवू लागले आहेत. याच कारणामुळे जग स्वच्छ ऊर्जेकडे वळत आहे.

# हिवतापाबाबत दक्षता घेण्याचे आवाहन



**मोर्शी**– राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचे वतीने जून महिना हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणुन पाळला जातो. हिवताप हा ?नाफिलीस डासांच्या मादिपासुन पसरणारा असल्याने काळजी घेतल्यास हिवतापापासुन मुक्तता मिळवु शकतो.या करीता उपायजोजना करणे गरजेचे असल्याने दिनांक 01 ते 30 जून पर्यंत हिवताप प्रतिरोध महिना पाळण्याचे आवाहन उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रमोद पोतदार, वैद्यकीय अधिकारी डॉ सचिन कोरडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ शरद जोगी, जिल्हा हत्तीरोग अधिकारी डॉ जुनेद यांच्या वतीने करण्यात आले आहे. दिनांक 01 ते 30 जून हा महिना आरोग्य विभागाच्या वतीने संपुर्ण राज्यात हिवताप प्रतिरोध महिना म्हणुन पाळण्यात येतो ?नाफिलीस डासांच्या मादिपासून पसरणारा हा आजार आहे. हा डास घरघुती पाणी, घरघुती भांडी, टाकी, रांजण, माठ,जुनाट टायर,फुटके डब्बे, फुटलेल्या बादल्या मध्ये साचलेल्या पाण्यात डास अंडी देतो, म्हणजेच पाण्यात तयार होणारा हा डास आहे. हिवतापावर नियंत्रण ठेवण्याकरीता खालील उपाययोजना करणे जरुरी आहे.

1) ताप आल्यास व ताप कमी होत नसल्यास रुग्णाचे अंग ओल्या कापडाने पुसून काढावे तसेच रुग्णाला ताबडतोब जवळच्या सरकारी उपकेंद्र , प्रा. आ. केंद्र , ग्रामीण रुग्णालय, किंवा खाजगी डॉक्टर कडून उपचार करुन घ्यावा.2) आठवड्यातील एक दिवस कोरडा पाळणे, म्हणजेच घरगुती पाणी साठवण्याची भांडी, हौद, माठ,टँक व रांजण इत्यादी 6व्या दिवशी घासुन स्वच्छ कोरडे करावे व पुर्ण सुकल्यानंतर पाणी भरावे. पाण्याची कमतरता असल्यास पाणी जाड कापडाने गाळून घ्यावे. व आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा.3) घराच्या छतावर किंवा आवारात पडुन असलेल्या निकामी वस्तु जसे टायर, शिश्या, टिनडब्बे यांना नष्ट करावे किंवा विल्हेवाट लावावी.4) प्रत्येकांनी आपआपल्या घरासमोरील नाल्या स्वच्छ ठेवाव्या.पाणी वाहते ठेवावे.5) घराच्या परिसरात डबके किंवा गटारे तयार होऊ देवु नये. झाल्यास घरगुती उपाय म्हणुन पाणी साठलेल्या ठिकाणी गप्पी मासे सोडावे.7) संडासच्या गॅस पाईपला पातळ कापड किंवा नायलॉनची पिशवी बांधावी.

8) डासापासून स्वरक्षणाकरीता मच्छरदाणीचा वापर करावा.9) शक्य असल्यास दरवाजे व खिडक्यांना जाळ्या लावुन डासांपासून बचाव करावा.10) डासांपासून बचावासाठी संध्याकाळच्या वेळेस लांब लचक पुर्ण बाजु कपड्यांचा वापर करून परीधान करावे.जनतेनी उपरोक्त उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यास डासोपत्तीस आळा घालने व त्यापासून होणाऱ्या हिवतापापासून मुक्ती सहज शक्य आहे.

या मोहिमेमध्ये उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील कर्मचारी विनय शेलुरे, प्रकाश मंगळे, प्रशांत बेहरे, एस व्ही कांबळे, नंदू थोरात, ऋषिकेश दहेकर, अक्षय शेवाळे, विनोद डहाके व रुग्णालयातील इतर कर्मचारी सहभागी होते.

## शेष पान 1 वरुन. . .

### जिल्हा खणीकर्म...

घाटावर गेले होते. शेळके घाटावर असताना डोंगरे यांनी त्यांच्याशी संपर्क साधला असता घाटावर अवैध रित्या उत्खनन सुरू असल्याचे शेळके यांनी मान्य केल्याचे डोंगरे यांचे म्हणणे आहे. पण त्यानंतर डोंगरे यांनी त्याच्याशी नेमकी काय कारवाई झाली ? हे जाणून घेण्यासाठी कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही.

डोंगरे यांनी जिल्हा खाणीकर्म अधिकारी श्रीकांत शेळके यांनी कारवाई न करण्यासाठी घाट चालकाकडून 14 लक्ष रुपये घेतल्याचा आरोप केला आहे. या आरोपात त्यांनीं श्रीकांत शेळके यांनी वरकमाईच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची माया जमविली आहे. त्यामुळे त्यांच्या संपत्तीची चौकशी करावी अशी मागणी देखील केली आहे.

**हिंगणघाट तालुक्यातील अनेक घाटात नियमबाह्य उपसा** – डोंगरे यांच्या मते शेळके यांच्या आशीर्वादाने हिंगणघाट तालुक्यातील देखील मोठ्या प्रमाणात अवैध रित्या उत्खनन करण्यात आले आहे. त्यामुळें नदी पात्रात 30 ते 40 फुटांचे मोठे खड्डे पडले आहेत.आणि त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता बळावली आहे.

**शेळके यांचेवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल व्हावा.**– डोंगरे यांच्या म्हणण्यानुसार हिंगणघाट तालुक्यात नदी पात्रात मोठ मोठे खड्डे पडल्याने मागील दिवसात या ठिकाणी एका इसमाचा मृत्यू झाला होता. या मृत्यूला शेळके जबाबदार असल्याने त्यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

### लोकप्रतिनिधींना...

लोकं स्वत:ला लोकप्रतिनिधींच्या जवळचे भासवतात तेच लोकं लोकप्रतिनिधींना अंधारात ठेवत असल्याचे उघड होत आहे.

**अधिकाऱ्यांवर दबाव टाकून मजूर संस्थेच्या नावावर घेतली जातात क्षमते बाहेर कामे** – अधिकाऱ्यांनी खाजगीत बोलतांना सांगितले की मजूर सहकारी संस्थेचे बनावटी अध्यक्ष स्वत:ला लोकप्रतिनिधींच्या जवळचे असल्याचे सांगून मलाईदार कामे मजूर सहकारी संस्थेच्या नावावर टाकायला लावतात. महत्वाचे असे की एका मजूर संस्थेला एका वर्षात 25 लाखांची कामे करता येतात असा शासकीय नियम आहे.पण धामणगाव तालुक्यातील मजूर सहकारी संस्था क्षमतेपेक्षा कितीतरी पटीने जास्त कामे करतात.

**लवकरच एक राजकीय पुढारी मजूर सहकारीं संस्थेच्या विरोधात कोर्टात जाण्याच्या तयारीत** – सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव टाकून क्षमतेपेक्षा जास्त कामे करणाऱ्या एका मजूर संस्थेच्या विरोधात जिल्ह्या बाहेरील एक राजकीय पुढारीं उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची चर्चा आहे. यात कथित अध्यक्ष , सुरवाती पासूनचे बनावट संचालक आणि नोकरीवर असताना देखील मजूर सहकारी संस्था चालवून शासनाला गंडवण्याचा प्रकारावरून लवकरच पडदा उठणार आहे. ( क्रमशः )

### थिलोरी ते...

मात्र रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. आगामी पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने तातडीने डागडुजीची कामे हाती घेण्याची मागणी करण्यात आली आहे.ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात, आठ दिवसांच्या आत रस्त्याची डागडुजी करण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाला दिला आहे.

याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाला निवेदन देतेवेळी थिलोरी येथील सामाजिक कार्यकर्ते शशांक पाटील धर्माळे , विक्की पाटील होले, कुणाल ओलोकर, अनिकेत सुरपाटणे, आदित्य पाटील होले, शेवानंद वाकपांजर, साहेबराव वाकपांजर, विनायक वाकपांजर, आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# रव्याच्या पदार्थबाबत मधुमेहींनी घ्यावी खबरदारी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला

**आर्वी**– आपल्या घराघरात उपमा, शिरा, हलवा यांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरला जाणारा रवा मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी पूर्णपणे वर्ज्य नसला, तरी तो खाताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. रवा हा प्रक्रिया केलेला पदार्थ असल्याने त्यात फायबरचे प्रमाण कमी असते. फायबर कमी असल्याने तो लवकर पचतो आणि रक्तातील ग्लुकोजची पातळी झपाट्याने वाढवतो. रव्याचा ग्लायसेमिक इंडेक्स साधारणपणे 54 ते 66 दरम्यान असतो. हा मध्यम श्रेणीतील त्वड्ढ आहे, पण जास्त प्रमाणात खाल्ल्यास रक्तातील साखर वाढू शकते. त्यामुळे केवळ त्वड्ढ पाहून पदार्थ निवडणे योग्य नाही. तज्ज्ञांच्या मते रवा खाताना त्यासोबत प्रथिनेयुक्त व फायबरयुक्त पदार्थ घेतल्यास रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते. रवा जास्त शिजवल्यास त्याचा त्वड्ढ वाढतो, म्हणून हलकासा परतून घ्यावा. प्रमाण, पद्धत आणि जोड या तीन गोष्टी लक्षात ठेवून खाल्ल्यास रवा आहारात ठेवता येतो. यासंदर्भात आर्वी, यवतमाळ व अमरावती येथील नामवंत डॉक्टरांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

रवा एकटाच न खाता त्यासोबत भरपूर हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये घ्यावीत. यामुळे ग्लुकोजचे शोषण मंदावते आणि साखर नियंत्रणात राहण्यास मदत होते. मधुमेहींनी प्रमाणात खावे हेच महत्त्वाचे.

**–डॉक्टर संगीता डोंगरे**
आर्वी

संपूर्ण गव्हाच्या तुलनेत रवा अधिक बारीक दळलेला असतो, त्यामुळे तो लवकर पचतो. मधुमेहाच्या रुग्णांनी उपमा, शिरा करताना त्यात गाजर, मटार, बीन्स, शेंगदाणे यांसारखे फायबरयुक्त घटक आवर्जून टाकावेत. जाडसर रवा निवडावा आणि एकावेळी वाटीभरापेक्षा जास्त खाऊ नये.

**–डॉक्टर सचिन विजयराव गुल्हाणे**
आर्वी

रवा खाताना त्यासोबत दही, ताक किंवा डाळी घेतल्यास प्रथिने मिळतात व रक्तातील साखर स्थिर राहते. शिऱ्यात साखरेऐवजी खजूर किंवा कमी प्रमाणात गूळ वापरावा. महिलांनी विशेषत: जेवणातील कार्बोहायड्रेटचे प्रमाण तपासून रवा घ्यावा.

**–डॉक्टर शारदा महेशजी माथुरकर**
यवतमाळ

मधुमेहींसाठी रवा पूर्ण बंद करण्याची गरज नाही, पण शिस्त हवी. सकाळी नाश्त्याला उपमा खाण्यापेक्षा दुपारच्या जेवणात भाज्यांसोबत मर्यादित प्रमाणात घेणे कधीही चांगले. नियमित साखर तपासणे व व्यायाम करणे आवश्यक आहे.

**–डॉक्टर अरुणजी पावडे**
आर्वी

‘रव्याचे पदार्थ आठवड्यातून 1-2 वेळा, तेही कमी तेलात व भरपूर भाज्या टाकून खावेत. मैदा आणि बारीक रवा टाळून दलिया किंवा जाड रव्याला प्राधान्य द्यावे. जीवनशैलीतील हा छोटासा बदल मोठा फरक घडवतो.’

**–डॉक्टर पवन मुकुंद निंबोरकर**
**आर्वी**

‘रवा हा पचायला हलका वाटतो म्हणून अनेकजण जास्त खातात, हीच चूक होते. मधुमेहींनी एका वेळी 1 छोटी वाटी उपमा खावा व त्यासोबत एक वाटी कोशिंबीर घ्यावी. यामुळे पोट भरते आणि साखरही झपाट्याने वाढत नाही.’

**–डॉक्टर रोशन जवळेकर**
आर्वी

‘रवा, मैदा, पांढरा भात हे %रिफाइंड कार्ब्स% आहेत. यांना आहारातून पूर्ण वगळण्यापेक्षा %पोर्टियन कंट्रोल% महत्त्वाचे. मधुमेहींनी रव्याचा शिरा करण्याऐवजी व्हेजिटेबल दलिया उपमा हा उत्तम पर्याय आहे. शंका असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.’

**–डॉक्टर अभिजित देशमुख**
अमरावती

**प्रेसनोट** – आरोग्य वार्ता मधील बातमीच्या आधारे जनजागृतीसाठी तयार करण्यात आली आहे. वैयक्तिक आहार व उपचारांसाठी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.ट्ठ

## शेष पान 4 वरुन. . .

### कौन है वह...

करतूतोंसे शहर का बच्चा बच्चा वाकिफ है । इसीलिए इन्हें यथाशीघ्र ‘ जय श्रीराम ’ करना जरूरी हो गया है ऐसा जनता का कहना है ।

**लोकप्रतिनिधि की क्या है कमजोरी** – लोकप्रतिनिधि के पास जिन लोगों का जमावड़ा है उनमेसे कुछ के लफड़े तो काम करनेवाली महिलाओं को तक पता है जहां इन लोगों के ल??ो के बारे में झूले में झूलने वाले बच्चे तक कों पता है तो लोकप्रतिनिधि को इस बारे में कैसे पता नहीं ? या फिर इन लोकप्रतिनिधि की क्या मजबूरी है कि उन्हें इन कथित लोफर लोगों को झेलना पड़ रहा है . ( क्रमश: )

### आज ( 10 जुन...

रोजी साजरा होणारा हा 27 वा वर्धापन दिन अत्यंत भावनिक आणि समर्पित वातावरणात संपन्न होणार आहे. अजितदादांच्या स्वप्नातील शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचारांनी प्रेरित होऊन, यशवंतराव चव्हाण यांनी रचलेल्या सुसंस्कृत राजकीय महाराष्ट्राचा वारसा जपण्याचा संकल्प करण्याचा हा सोहळा आहे. समर्पण, संघर्ष आणि संकल्प भावनेतून साजरा होणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या 27 व्या वर्धापन दिन कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व सेलचे प्रमुख,आजी -माजी पदाधिकारी कार्यकर्ते व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

### अन्नत्याग आंदोलनाची...

यांच्यासोबत चर्चा होऊन मागण्यांवर बैठक घेण्याचे व काही मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले.तसेच माजी कॅबिनेट मंत्री यशोमती ठाकूर व माजी महापौर विलासराव इंगोले यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल गिरीश चौधरी यांनी आभार व्यक्त केले.तहसीलदारांच्या स्वाक्षरीचे पत्र तलाठी बोंडे (मासोद) व वडाळी मंडळ अधिकारी यांच्या हस्ते आंदोलनस्थळी पोहोचविण्यात आले. त्यानंतर गौरव नंदनवार यांच्या हस्ते ज्यूस पाजून अन्नत्याग आंदोलनाची सांगता करण्यात आली. यावेळी तुषार मेश्राम, अक्षय कुंभरे, अक्षय मसराम, गौरव मसराम, अभिषेक उमक, सूरज महाराज गवळी, अमोल बावणे, सार्थक बोरकर, विशाल नंदनवार, राहुल काळबांडे, प्रज्वल केवतकर, शुभम मसराम, आशिष धर्माळे, अविनाश मालठाने, ईश्वर गावंडे, विकास वाकोडे, उषा फसाटे, सचिन घोंगडे (शेवती) यांच्यासह मोठ्या संख्येने युवक व नागरिक उपस्थित होते.आंदोलनादरम्यान दि. 8 रोजी दुपारी वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. यावेळी अंजनगाव बारी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. मंगेश पाटील, व्ही. एम. जाधव तसेच अंजनगाव बारी परिसरातील गावातील नागरिक व युवक मंडळी उपस्थित होती.

### अंजनगाव बारीत...

मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वीज वितरण यंत्रणेलाही फटका बसल्याने काही भाग अंधारात बुडाला. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

वादळी वाऱ्यामुळे रस्त्यांवर झाडे व फांद्या पडल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला. पावसाचा जोर आणि वादळामुळे नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. सुदैवाने जीवितहानीची कोणतीही घटना घडली नसली तरी मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाचे कर्मचारी व स्थानिक प्रशासनाने नुकसानग्रस्त भागांची पाहणी सुरू केली असून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. नुकसानग्रस्त नागरिकांनी शासनाकडे पंचनामे करून तातडीची मदत देण्याची मागणी केली आहे.

### अजून त्यांच्या ...

जेव्हा पाण्यातून बाहेर काढण्यात आले तेव्हा त्यांच्या शरीराला दगड बांधलेले होते. म्हणजे कदाचित दोघांनी घेतलेल्या निर्णयावरूनअंतिम क्षणीं कोणी मागे हटू नये यासाठी त्यांनी शरीराला दगड बांधले असावे असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

**इतका धक्कादायक निर्णय का ?** – या दोघांनी असा धक्कादायक निर्णय का घेतला असावा ? असा प्रश्न फक्त दोघांचे आईवडील आणि नातेवाईकच नव्हे तर गावकऱ्यांना देखील सतावत आहे.

### छत्रपती शिवराज्या...

अवधूत गाडेकर अरविंद गाडेकर सौ. रत?नाबाई गोतमारे शुभांगी नाडे गजानन गाडेकर पुष्पा गोमाशे मंगेश ढवळे इत्यादींची उपस्थिती होती त्याचप्रमाणे ग्रामपंचायत द्वारा कार्यक्रमाला सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले .

### जळगाव आर्वी...

कार्यालयात उपस्थिती राहण्याचे दोन दिवस असताना ते येतच नसल्याने त्याचा फायदा आता कर्मचारी सुद्धा घेत आहे. चक्क ग्रा. प. कार्यालयात कुलूप लावून मनमानी कारभार सुरु असल्याचे जळगाव आर्वीत पाहायला मिळत आहे. दरम्यान कर्मचाऱ्याला फोन केला असता फोन सुद्धा उचलत नसल्याची ओरड आहे. वास्तविक पाहता अधिकारी जरी कामानिमित्त दौऱ्यावर गेले असले तरी ग्रा. प. कार्यालय शासकीय वेळेत सुरु असणे बंधनकारक आहे. मात्र जळगाव आर्वीत पूर्णपणे शासकीय नियमाचा फज्जा अधिकारी आणि कर्मचाऱ्याकडून उडविला जात आहे.

**गटविकास अधिकारी ग्रामसेवक आणि कर्मचाऱ्यावर कारवाई करणार का ?**– जळगाव आर्वीतील ग्राम प. मध्ये अनेक दिवसापासून सुरु असलेला खेळखंडोबा नागरिकांच्या नाकी नऊ आल्याने त्या संदर्भात गटविकास अधिकाऱ्याकडे थेट ग्रामसेवक आणि कर्मचाऱ्याविरुद्ध कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी तक्रार करण्यात आली असून कारवाईची मागणी करण्यात आली आहे. त्यावर कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी प्रफुल घोरपडे यांनी तात्काळ ग्रामसेवकांकडून खुलासा मागविण्याची सूचना दिली आहे.

# एपद्वारे खत विक्रीमुळे शेतकरी त्रस्त; प्रणाली तात्काळ बंद करा - शिवसेना

**छत्रपती संभाजीनगर** – जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या एपद्वारे खत विक्री प्रणालीमुळे शेतकरी बांधवांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ही प्रणाली तात्काळ बंद करून शेतकऱ्यांना मुक्तपणे खत खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने जिल्हा कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



सदर एपमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असून सर्व्हर बंद पडणे, एप हँग होणे, माहिती चुकीची दिसणे तसेच व्यवहार पूर्ण न होणे अशा अनेक समस्यांमुळे शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन, इंटरनेट सुविधा किंवा आवश्यक तांत्रिक ज्ञान नसल्याने या प्रणालीचा वापर करणे कठीण ठरत आहे. परिणामी पेरणी व पीक व्यवस्थापनाच्या महत्त्वाच्या कालावधीत शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत असून शेतीची कामेही प्रभावित होत आहेत.

शेतकरी हा ग्राहक असल्याने त्याला कोणत्याही अधिकृत खत विक्रेत्याकडून आपल्या गरजेनुसार खत खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असावे. मात्र सध्याच्या एप-आधारित व्यवस्थेमुळे अनावश्यक निर्बंध निर्माण होत असल्याने ही प्रणाली त्वरित बंद करून कोणत्याही तांत्रिक अटींशिवाय खत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाची प्रत मा. खासदार साहेब यांनाही देण्यात आली असून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित मंत्र्यांशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली. शेतकरी हिताचा विचार करून प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकरी बांधवांच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेच्या वतीने देण्यात आला.

निवेदन देताना संदीप पाटील आढाव (उपतालुका प्रमुख, शिवसेना), कृष्णा पाटील पराड (जिल्हाध्यक्ष), अजय हिंगमिरे (उपतालुका प्रमुख, युवा सेना शिवसेना) तसेच अशोक भाऊ भागवत (शिवसेना पदाधिकारी) उपस्थित होते.

# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व दशकपूर्ती अभियान संपन्न



**मोर्शी / प्रतिनिधी**

उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक मां डॉ प्रमोद पोतदार यांचे मार्गदर्शनाखाली प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व दशकपूर्ती अभियान राबविण्यात आले हे अभियान माननीय प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांचे संकल्पनेतून 2016 ते 2026 या दहा वर्षाच्या कालावधीत राबविण्यात आले या अभियानाचे घोषवाक्य सुरक्षित गर्भधारणा निरोगी माता सक्षम भारत हे आहे.

या अभियानामध्ये सुरक्षित मातृत्वाला बळकटी देऊन तज्ञ डॉक्टर कडून तपासणी व सेवा सोनोग्राफी उच्च जोखीम गर्भावस्था ओळख व व्यवस्थापन सुरक्षित प्रसूती पूर्व उच्च जोखीम गर्भवती महिलेचे वैयक्तिक निरीक्षण व तपासणी पी एम एस एम ए सत्रात सहभागी होण्यासाठी घरगुती महिलांना प्रोत्साहन म्हणून मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध सुरक्षित प्रसुतीसाठी जवळच्या प्रथम संदर्भ सेवा केंद्र शी संपर्क रक्त व लघवीची सर्व आवश्यक तपासण्या लोह कॅल्शियम गोळ्या व टीडी लसीकरण पोषण संतुलित आहार व कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन इत्यादी सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

या कार्यक्रमांमध्ये रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी स्त्री रोग तज्ञ डॉक्टर शुभम तट्टे यांनी गर्भवती मातांना सखोल मार्गदर्शन केले तसेच स्ट॥ द्वठ्ठ जयश्री मोरे यांनी उपस्थित सर्व गर्भवती मातांना सखोल मार्गदर्शन करून आवश्यक सर्व माहिती दिली यावेळी रुग्णालयाचे कर्मचारी विनय शेलुरे, प्रकाश मंगळे, प्रशांत बेहरे, कल्पना पंधरे, पुष्पा पंधरे भारती बाकडे अर्चना पवार व रुग्णालयातील इतर सर्व कर्मचारी हजर होते.

# एक चैनल के पत्रकार को लेकर शहर में गरमाया चर्चाओं का बाजार

**पहले से ही दर्ज है एक अपराध का मामला**

**मामला न्यायप्रविष्ट होने कि चर्चा**

**भंडारा / विशेष संवाददाता**

भंडारा शहर में इन दिनों एक अन्य जिले से यहां आए पत्रकार को लेकर माहौल गरमाया हुआ हैं । स्थानीय पत्रकारों के मुताबिक ऐसे आरोपित पत्रकार को अपने बैनर में काम देना मीडिया में उच्च पद पर बैठे वरिष्ठ लोगों को शोभा नहीं देता । ऐसे व्यक्ति को काम देने से न केवल मीडिया क्षेत्र का नाम खराब होता है बल्कि जिस मीडिया में बदनाम शक्श काम कर रहा हो उस मीडिया को भी जनता कुछ अलग ही नजर से देखने लगती है ।

फ़िलिहाल भंडारा में अन्य जिले से आए एक पत्रकार को लेकर चर्चाओं का बाजार गर्म है। न केवल आम जनता बल्कि पत्रकारिता क्षेत्र में भी



इसी शक्श को लेकर माहौल गरमाया हुआ है । पत्रकारों का तो यहां तक कहना है कि किसी एक मामले में आरोपित इस कथित बदनाम शख्स को बड़े लेवल के मीडिया काम करने का मौका ही क्यों देते है । ऐसे बदनाम लोग अगर मीडिया क्षेत्र से जुड़े रहे तो समाज तथा प्रशासन का अन्य मीडिया कर्मियों को देखने का नजरिया बदल जाता है । स्थानीय पत्रकारों का तो यहां तक कहना है कि एक ओर जहा बड़ा मीडिया अपने यहां काम देने के पहले उसका चरित्र प्रमाणपत्र तथा अन्य कागज मांगता है तो वही नियम इस शक्श पर क्यों लागू नहीं किए गए।

इस शक्श पर फिरौती का गुनाह दर्ज होने की है चर्चा – यहां के पत्रकारों का तो यहां तक कहना है कि पंचायत समिति में कार्यरत एक लिपिक से इसने छुट्टी तथा मेडिकल लिव के बिल पास करवाने के नाम पर फिरौती मांगी थी। संबंधित व्यक्ति के शिकायत के। बाद इसपर अपराध भी दर्ज हुआ था। जो मामला आज भी अदालत में विचाराधीन है ।

# श्री. धनंजय वसंतराव गणोरकर यांचा विदर्भ प्रबोधन मंडळातर्फे सत्कार

**दर्यापूर**- दर्यापूर येथील सुमारे 168 वर्षांची परंपरा लाभलेल्या आणि पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दशरथी श्रीराम मंदिर संस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपदी श्री. धनंजय वसंतराव गणोरकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल विदर्भ प्रबोधन मंडळातर्फे त्यांचा शाल व श्रीफळ देऊन भव्य सत्कार करण्यात आला.या सत्कार समारंभास विदर्भ प्रबोधन मंडळाचे चेअरमन श्री. जयसिंगदादा देशमुख, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष एड. संतोषजी धर्माधिकारी, विश्वस्त श्री. बाप्पुसाहेब उर्फ



भालचंद्रजी कोरपे, श्री. माधवजी बुरघाटे, श्री. प्रभाकररावजी कोरपे, एड. आदित्यजी धर्माधिकारी, एड. आदित्यजी देशमुख, कार्यकारणी सदस्य श्री किशोरजी गणोरकर,डॉ दिलीपजी देशमूख तसेच प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. नरेंद्रजी गोंडाणे तसेच शिक्षक प्रतिनिधी श्री. गजाननजी सरदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री धनंजय गणोरकर हे विदर्भ प्रबोधन मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत असून सामाजिक, शैक्षणिक व कल्याणकारी उपक्रमांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे श्री दशरथी श्रीराम मंदिर संस्थानच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.यावेळी उपस्थितांनी श्री. धनंजय वसंतराव गणोरकर यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. संपूर्ण विदर्भ प्रबोधन मंडळ व प्रबोधन परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# पीओके मध्ये हजारो लोक रस्त्यावर उतरले

**इस्लामाबाद** – पाकव्याप्त काश्मीरमध्ये मंगळवारी अचानक परिस्थिती चिघळली. याठिकाणी अनेक शहरांमध्ये देशव्यापी बंद आणि मोठी निदर्शने सुरू झाली. रावलकोट, मुझफ्फराबाद, कोटली, भीमबर, दाद्याल, पलांद्री, सुधनोटी येथे हजारो लोक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी पाकिस्तानी सरकार व लष्कराच्या विरोधात घोषणाबाजी केली. इथल्या आंदोलकांनी तांदूळ, डाळी आणि इतर वस्तूंच्या वाढत्या किंमतीविरोधात आक्रमक पवित्रा घेत आंदोलकांनी स्वातंर्त्याची मागणी केली. त्यांनी प्रशासनावर आपली आश्वासने मोडल्याचा आरोप केला. रावलकोटमध्ये सकाळी 11 वाजता मोठी निदर्शने सुरू झाली. आंदोलकांनी मुख्य रस्ता अडवला आणि शहराच्या अनेक भागांतून मोर्चा काढला. भीमबरकडून रावलकोटच्या दिशेने जाणाऱ्या आंदोलकांना रोखण्यात आल्यावर परिस्थिती आणखी चिघळली. पाकिस्तानी पोलीस, लष्कर आणि रेंजर्सनी त्यांच्यावर कारवाई सुरू केली. आंदोलकांना रोखण्यासाठी गोळ्या झाडण्यात आल्या, पेलेट गनचा वापर करण्यात आला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फेकण्यात आल्या असा आंदोलकांचा आरोप आहे.

# तुकाराम मुंढे यांच्या धडाकेबाज कारवाईच्या पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी तालुक्यात विशेष तपासणीची नागरिकांची मागणी

## गुणवत्ता चाचण्या, पडताळणी व दोषींवर कठोर कारवाईसाठी नागरिकांचा आग्रह; वरिष्ठ विभागाने लक्ष देण्याची गरज


**अनिल गौर / अंजनगाव सुर्जी**

राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली भेसळयुक्त अन्नपदार्थ, निकृष्ट दर्जाची उत्पादने, बनावट औषधे आणि नियमबाह्य व्यवसायांविरोधात धडाकेबाज कारवाया सुरू आहेत. या कारवायांमुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला असून, याच धर्तीवर अंजनगाव सुर्जी तालुक्यातही विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी जोर धरत आहे.

तालुक्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिठाई दुकाने, बेकऱ्या, दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्रे, किराणा दुकाने तसेच औषध विक्री प्रतिष्ठानांची नियमित तपासणी करून अन्न व औषधांच्या गुणवत्तेची खात्री करण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी आहे. शहर व ग्रामीण भागात विक्री होणाऱ्या विविध खाद्यपदार्थांची तसेच औषधांची गुणवत्ता तपासण्यासाठी नमुने घेऊन प्रयोगशाळेत चाचणी करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या मते, दूध, तूप, खाद्यतेल, मसाले, मिठाई, थंड पेये, पॅकेज्ड खाद्यपदार्थ तसेच औषधांच्या गुणवत्तेची वेळोवेळी पडताळणी होणे आवश्यक आहे. तपासणीदरम्यान भेसळयुक्त, मुदतबाह्य किंवा निकृष्ट दर्जाची उत्पादने आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणालाही पाठीशी घालू नये, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विशेषत: सण-उत्सव, लग्नसराई आणि उन्हाळ्याच्या हंगामात अन्नपदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री होत



असल्याने अशा काळात अचानक तपासणी मोहिमा राबविण्याची गरज आहे. औषध विक्री केंद्रांमध्येही परवान्यांची पडताळणी, औषध साठ्याची तपासणी, मुदतबाह्य औषधांची पाहणी आणि नियमांचे पालन होत आहे की नाही याची खातरजमा करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.यासोबतच नागरिकांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्याकडे अन्न व औषध प्रशासनाच्या वरिष्ठ विभागाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. अनेकदा ग्रामीण व निमशहरी भागांमध्ये नियमित तपासण्यांचे प्रमाण कमी असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुक्यात विशेष मोहीम राबवून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी, तपासण्यांची




वारंवारता वाढवावी आणि आवश्यक तेथे तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तसेच अन्न व औषध प्रशासनाने जनजागृती उपक्रम राबवून ग्राहकांना त्यांच्या हक्कांची माहिती द्यावी, भेसळयुक्त पदार्थ ओळखण्याबाबत मार्गदर्शन करावे आणि तक्रारींचे तत्काळ निवारण करावे, अशीही मागणी आहे.एकंदरीत, अंजनगाव सुर्जी तालुक्यात सुरक्षित, दर्जेदार आणि आरोग्यदायी अन्न व औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यव्यापी मोहिमेच्या धर्तीवर विशेष तपासणी मोहीम राबविणे काळाची गरज बनली आहे. गुणवत्तेची खात्री, नियमित पडताळणी, दोषींवर कठोर कारवाई आणि वरिष्ठ विभागाचे विशेष लक्ष यामुळेच नागरिकांच्या आरोग्याचे प्रभावी संरक्षण होऊ शकणार असल्याचे मत सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

# कौन है वह नमकहराम नगरसेवक , जिस थाली में खाया उसी में छेद गिराया

## पहले से बदनाम व्यक्तियों का लोकनेता के पास लगा है जमावड़ा

**धामनगांव रेल्वे / विशेष संवाददाता**

शहर में इन दिनों लोकनेता के इर्दगिर्द मंडरानेवाले तथा अपने आप को लोकनेता के बहुत करीबी होने का दावा करनेवाले उन तीन चार कार्यकर्ताओं को लेकर चर्चाओं का बाजार गर्म है । साथ ही लोकनेता की ऐसी क्या मजबूरी है कि इन बदनाम लोगों को वे पुचकारते है इस विषय को लेकर जनता की आपस में चर्चा होती रहती है । हाल ही में दत्तापुर क्षेत्र में पकड़ा गया वह नगरसेवक कौन है ? बात को लेकर तरह तरह की चर्चा जारी है ।

शहर में इन दिनों उस नगर सेवक को लेकर चर्चा जोरो पर है जिसके किसी महिला के साथ दत्तापुर क्षेत्र में पकड़े




जाने की चर्चा छोटे बच्चे से लेकर तो बड़े बुजुर्गों के जुबान पर है । जनता के बीच तो उस नगर सेवक की करतूतों को लेकर काफी नाराजगी देखी जा रही है ! उसके बारे में तो यही कहा जा रहा है कि उसने जिस थाली में खाया उसी में छेद किया ।

**लोकप्रतिनिधि के पास है बदनाम कार्यकर्ताओं का जमावड़ा** - जनता के बीच चल रही चर्चाओं के मुताबिक लोकप्रतिनिधि के इर्दगिर्द जिन कार्यकर्ताओं का जमावड़ा है वह भले ही अपने आप को शहर का बड़ा व्यापारी, किसी कथित संस्था का पदाधिकारी हो या किसी संस्था में कार्यरत हो इनके किसी काम में ' राम ' नहीं है। इनकी ( पृष्ठ 2वर )

# महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची बोरगाव धर्माळे येथे सदिच्छा भेट



**अंजनगाव बारी/ पवन इंगोले**

महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री यांनी दि. 8 जून 2026 रोजी बोरगाव धर्माळे येथील धर्माळे कुटुंबाच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन आपुलकीचा परिचय दिला. ग्रामीण भागातील एका सामान्य कार्यकर्त्याच्या घरी मंत्री महोदयांनी स्वत: भेट दिल्याने कुटुंबीयांसह गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी धर्माळे कुटुंबातील पुंडलिकराव धर्माळे, मंदाताई धर्माळे, रुशाली धर्माळे, श्रावणी, समीर धर्माळे, सूनबाई तसेच गोकुल यांची मंत्री महोदयांनी आस्थेने भेट घेत प्रेमळ आशीर्वाद दिले. तसेच धर्माळे कुटुंबाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.या स्नेहपूर्ण भेटीदरम्यान विविध सामाजिक विषयांवर चर्चा झाली. मंत्री महोदयांच्या मार्गदर्शनामुळे आणि शुभेच्छांमुळे पुढील सामाजिक वाटचालीस नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाल्याची भावना धर्माळे कुटुंबाने व्यक्त केली.ग्रामीण भागातील एका छोट्या कार्यकर्त्याच्या घरी येऊन दिलेल्या या सदिच्छा भेटीबद्दल धर्माळे कुटुंबाने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे यांनी मन:पूर्वक आभार मानले.

# आज (10 जुन)ला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा 27 वा वर्धापन दिन समर्पण, संघर्ष आणि संकल्प भावनेतून साजरा होणार

**सर्व सहकाऱ्यांनी आ.सौ. सुलभाताई खोडके यांचे जनसंपर्क कार्यालय येथे उपस्थित राहण्याचे आवाहन**





**अमरावती** - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा 27 वा वर्धापन दिन बुधवार, दि. 10 जून 2026 रोजी आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे सकाळी 9.30 वाजता आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण व मानवंदना देऊन पक्षाचा गौरव सोहळा साजरा करण्यात येईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि देशभरात पक्षाचा विस्तार करण्यासाठी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे हा 27 वा वर्धापन दिन पूर्णपणे अजितदादांना समर्पित करण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री माननीय सुनेत्रावहिनी अजित पवार यांच्या नेतृत्वात बुधवार दिनांक 10 जून 2026( पृष्ठ 2वर )

# अन्नत्याग आंदोलनाची सांगता; प्रशासनाकडून दखल

**लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे; मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाला गिरीश चौधरी यांचा इशारा**



**पवन इंगोले /अंजनगाव बारी**- विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या गिरीश चौधरी यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा दि. 8 जून रोजी सायंकाळी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर समारोप करण्यात आला. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशीही मागण्यांबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने गिरीश चौधरी यांनी 'मागण्या मान्य होईपर्यंत अन्नत्याग आंदोलन सुरूच राहील' असा इशारा दिला होता. त्यानंतर प्रशासनाची हालचाल सुरू झाली.

प्रशासनाने आंदोलनाची दखल घेत लेखी आश्वासन दिले असले तरी माझ्या सर्व मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. केवळ आश्वासनांवर नागरिकांचा विश्वास राहणार नाही. ठरलेल्या मुदतीत मागण्या पूर्ण न झाल्यास जनतेच्या हक्कांसाठी पुन्हा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी.

-**गिरीश चौधरी,** मासोद

**पत्रकारांच्या निर्भय लेखणीमुळे आंदोलनाला न्याय:गिरीश चौधरी**

निर्भय पत्रकारिता आणि कणखर लेखणीच्या बळावर माझ्या आंदोलनाची दखल प्रशासनाला घ्यावी लागली. जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणाऱ्या पत्रकार बांधवांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच आंदोलनाला योग्य न्याय मिळाला.तसेच सर्व दैनिकांचे संपादक, पत्रकार, प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांचे गिरीश चौधरी यांनी मन:पूर्वक आभार मानले. त्यांच्या निर्भय पत्रकारितेमुळेच आंदोलनाला व्यापक प्रसिद्धी मिळून प्रशासनाला दखल घ्यावी लागल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी खासदार बळवंत वानखडे यांनी दूरध्वनीद्वारे सातत्याने पाठपुरावा केला. उपविभागीय अधिकारी विजय भटकर, तहसीलदार विजयराव लोखंडे ( पृष्ठ 2वर )

# अंजनगाव बारीत मान्सूनपूर्व पावसाची जोरदार हजेरी

- वीजवाहिन्यांवर झाडे कोसळल्याने विद्युतपुरवठा खंडित
- तात्पुरते शेड, मंडप व संरचनांचे मोठे नुकसान

**अंजनगाव बारी ( पवन इंगोले )** - अंजनगाव बारी परिसरात सोमवारी सायंकाळी मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावत नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी वीजवाहिन्यांवर



झाडांच्या फांद्या कोसळल्याने विद्युतपुरवठा खंडित झाला.

वादळाच्या तडाख्याने आमच्या रेस्टॉरंटचे मोठे नुकसान झाले. एका क्षणात उभा व्यवसाय उद्ध्वस्त झाला. प्रशासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा.

-**रोशन पुनिया,** अंजनगाव बारी

वादळाचा वेग इतका प्रचंड होता की अनेक ठिकाणचे तात्पुरते शेड, मंडप व संरचना जमीनदोस्त झाल्या. शेतशिवारातील तसेच गावालगतच्या भागातील झाडांचे ( पृष्ठ 2वर )


# अजून त्यांच्या संसाराला सुरवात व्हायचीच होती की दोघांनी घेतला हादरवून टाकणारा निर्णय

**पती पत्नीने शरीराला दगड बांधून घेतली विहिरीत उडी**

**मुली आणि मुलांच्या पालकांनी फोडला हंबरडा**

**मारेगाव /विशेष प्रतिनिधीं**

लग्नाला फक्त महिना उलटला होता. दोघेही भावी भविष्याची स्वप्न रंगवत होते. अजून हिरवा मांडव उभा होता.आणि अश्यातच त्यांनी जगाला सोडून जाण्याचा निर्णय घेतला. लग्नाला एक महिना होत असतानाच त्यांनी घेतलेल्या या अकल्पनीय निर्णयामागे नेमके कारण काय ? हा मुद्दा त्याच्या सोबत पाण्यात विरघळला आहे. पण त्यांनी उचललेल्या या हृदयाचा थरकाप उडवणाऱ्या निर्णयामुळे मुलाच्या आणि मुलीच्या पालकांना बसलेला धक्का शब्दात वर्णन करणे कठीण होऊन बसला



आहे. घटना मारेगाव तालुक्यातील सग्नापूर गावातील आहे. येथील तरुण आशिष धानोरकर याचे लग्न करिश्मा सोबत जवळपास एक महिन्या अगोदर झाले होते. देवपूजा आणि इतर परंपरा आटोपल्यावर त्यांनी एकमेकांना समजून घेत सुखी संसाराची स्वप्ने रंगवणे सुरू केले होते. पण नियतीला हे मंजूर नसावे. कोणाला काही न सांगता घरातून बाहेर पडलेल्या या जोडप्याने असे पाऊल उचलले की त्यांच्या पालकांना आयुष्य भराचे दु:ख देऊन गेले.

रात्री आठ वाजता ( दिं8 जून बाईक ने घरातून बाहेर पडलेले आशिष आई करिष्मा उशिरा रात्री पर्यंत घरी न परतल्याने आई वडिलांना चिंता वाटू लागली. त्यांनी शोधाशोध सुरू केली असता शेतातील विहिरीजवळ आशिष ची बाईक आढळून आली. त्यामुळे आई वडीलांच्या काळजात धस्स झाले. गावकऱ्यांनी विहिरीत शोध घेतला असता दोघांचे मृतदेह आढळून आले.

**पोटाला दगड बांधून घेतली पाण्यात उडी** - त्या दोघांचे मृतदेह( पृष्ठ 2वर )

# छत्रपती शिवराज्याभिषेक सोहळा व जागतिक पर्यावरण दिन संपन्न



**नांदगाव खंडेश्वर/तालुका प्रतिनिधी**

माहुली चोर येथे ग्रामपंचायत द्वारा राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न झाला यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन दीप प्रज्वलन करण्यात आले त्यानंतर गुढी उभारून पूजन करण्यात येऊन मानवंदना देण्यात आली त्याचप्रमाणे जागतिक पर्यावरण दिनाच्या दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन त्यामध्ये वृक्ष पूजन करण्यात आले पर्यावरणाचे संरक्षण होण्याकरता वृक्ष लागवड पाणी बचत पाणी व अडवणे प्रदूषण प्लास्टिकचा वापर न करणे त्याचप्रमाणे माझी वसुंधरा अभियानांतर्गत शपथ घेण्यात येऊन वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी सरपंच सौ. संगीता झंजाट निखिल चोरे विपिन काकडे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश दाते सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी गोपाळ ढोडरमल ( पृष्ठ 2वर )

# जळगाव आर्वी ग्रामपंचायत वाऱ्यावर ?

- ना अधिकारी, ना कर्मचारी, कार्यालयाला नेहमीच कुलूप
- ग्रामसेवकच ग्रा.प. ला येत नसल्याने कर्मचारीही कुलूप लावून करतात मनमानी

**धामणगाव रेल्वे** - शासनाने कर्मचाऱ्याचा कामाचा आठवडा अवघ्या 5 दिवसावर आणला असतानाही त्या दिवसामध्ये सुद्धा शासकीय कार्यालये कुलूप लावून दिसत असल्याचे चित्र धामणगाव तालुक्यात दिसत आहे. सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. जळगाव आर्वी ग्रा.प. ला रामगाव आणि गंगाजळी या गावाचा समावेश असून कुठलेही शासकीय कागदपत्रे लागल्यास अथवा गावातील समस्याविषयी तक्रार द्यायची असल्यास 10 किमी जाऊन ग्रा. प. कार्यालय गाठावे लागते. मात्र केव्हाही गेले कि, ग्रा. प. कार्यालय हे कुलूप बंद असल्याने त्या नागरिकांना वेळ आणि पैशाचा अपव्यय होत असल्याचे चित्र आहे.

**ग्रामसेवक कार्यालयात येतच नसल्याची**




**नागरिकांची ओरड आणि प्रशासकाची कबुली** - जळगाव आर्वी येथे ग्रामसेवक गजानन काळमेघ यांची नियुक्ती असून तळेगाव द ग्रा. प. चा सुद्धा पदभार त्यांच्याकडे आहे त्यामुळे पंचायत समितीकडून आठवड्यातील 3 दिवस तळेगाव दशासर आणि 2 दिवस जळगाव आर्वी असा त्यांचा उपस्थित राहण्याचा दिवस आहे. ग्रामसेवक कार्यालयात येतच नसल्याची ओरड नागरिकांमध्ये आहे. तसेच प्रशासक सत्यभामाताई कांबळे यांनी सुद्धा ग्रामसेवक मागील बरेच दिवसापासून आले नसल्याची कबुली दिली. तसेच ते कधी येतात काही नाही याची कुठलीही माहिती मला देत नसल्याचे सांगितले. त्यामुळे नागरिकांच्या समस्यांना मलाच जवाब द्यावे लागत असल्याचे म्हणणे आहे. ग्रामसेवक कार्यालयात येत नसल्याने एका निराधार महिलेला सही शिक्क्यासाठी 3 दिवस ग्रा. च्या चकरा माराव्या लागल्याचे सुद्धा प्रशासकांकडून सांगण्यात आले.

**ग्रामसेवक येत नसल्याने कर्मचारीही कार्यालयात कुलूप लावून करतात मनमानी** - ग्रामसेवकाची ( पृष्ठ 2वर )

साप्ताहिक 'नव प्रहार' हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक संजय राजेंद्रप्रसाद पांडे यांनी मुद्रक हेमंत रामकिशोर जयस्वाल यांच्या श्रद्धा प्रिंटर्स, नमुना गल्ली क्र. ४ अमरावती ( महाराष्ट्र ) येथे छापून कार्यालय : वार्ड नं. १२ को. ऑप. हाऊसिंग सोसायटी धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित केले. सर्व वाद-विवाद धामणगाव रेल्वे न्यायालय अंतर्गत राहिल. मुख्य संपादक : संजय राजेंद्रप्रसाद पांडे RNI no.- MAHBIL/2013/5475